पुण्य नगरी SMART नंदुरबार

# नाविन्यपूर्ण योजनेतून बचत गटांच्या उत्पादनांसाठी मॉल

## ना. जयकुमार रावल : राज्य महिला आयोगातर्फे राबविण्यात येणाऱ्या प्रज्वला उपक्रमाच्या पहिल्या टप्प्याचा शुभारंभ

**नंदुरबार : जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत नाविन्यपूर्ण योजनेतून महिला बचत गटांच्या उत्पादनांची विक्री करण्यासाठी नंदुरबार येथे मॉल उभारण्यात येईल. त्यासाठी प्रशासनाने तात्काळ सरकारी जागा उपलब्ध करून द्यावी, असे प्रतिपादन राज्याचे पर्यटन, रोहयो, अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.**

### ‘प्रज्वला’चा दुसरा टप्पादेखील नंदुरबारपासून सुरू करणार : विजया रहाटकर





### जागा उपलब्ध झाल्यास बाजार उभारणी

### ॲपच्या माध्यमातून देण्यात येणार माहिती

आदिवासी भागातील पारंपारिक दागिने, आमचूर, पारंपरिक हस्तकला अशा उत्पादनांना जागतीक बाजारपेठ मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या मदतीने तयार होणाऱ्या ॲपच्या माध्यमातून बचत गटांच्या उत्पादनांची माहिती देण्यात येईल.

दै.देशदूत

दि. १६ जून २०१९

# महिला आयोगातर्फे राबविल्या जाणाऱ्या

# प्रज्वला अभियानाचा शुभारंभ

## नाविन्यपूर्ण योजनेतून बचत गटांच्या उत्पादनांसाठी मॉल - ना.जयकुमार रावल

■ नंदुरबार । दि.१५ । प्रतिनिधी

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत नाविन्यपूर्ण योजनेतून महिला बचत गटांच्या उत्पादनांची विक्री करण्यासाठी नंदुरबार येथे मॉल उभारण्यात येईल, त्यासाठी प्रशासनाने तात्काळ सरकारी जागा उपलब्ध करून द्यावी, असे प्रतिपादन राज्याचे पर्यटन, रोहयो, अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.

छत्रपती शिवाजी नाट्यमंदिर येथे राज्य महिला आयोगातर्फे राबविण्यात येणाऱ्या प्रज्वला उपक्रमाच्या



पहिल्या टप्प्याच्या शुभारंभाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, खा.डॉ.हीना गावीत, आ.डॉ.विजयकुमार गावीत, जिल्हाधिकारी बालाजी मंजुळे, मुख्य कार्यकारी अधिकारी विनय गौडा, अतिरिक्त पोलीस अधीक्षक चंद्रकांत गवळी, प्रज्वला योजनेच्या अध्यक्षा दिपाली मोकाशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी बापूराव भवाने, गटविकास अधिकारी अशोक पटाईत आदी उपस्थित होते.

ना.रावल म्हणाले, राज्यातील बचत गटांच्या उत्पादनांचे चांगले ब्रँडींग आणि पॅकेजींग करून त्यांना बाजारपेठ मिळवून देणे महत्वाचे आहे. त्यादृष्टीने प्रज्वला योजनेअंतर्गत देण्यात येणारे प्रशिक्षण उपयुक्त ठरेल.

आदिवासी भागातील पारंपरिक दागिने, आमचूर, पारंपरिक हस्तकला अशा उत्पादनांना चांगली बाजारपेठ मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या नव्याने तयार होणाऱ्या ॲपच्या माध्यमातून बचत गटाच्या उत्पादनांची माहिती देण्यात येईल. पर्यटन विभागाच्या हाटच्या माध्यमातूनदेखील बचत गटांच्या उत्पादनांसाठी गाळे उपलब्ध करून देण्यात येतील.

महिलांचा विविध क्षेत्रातील सहभाग वाढावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे. यासाठी महिलांचे सबलीकरण महत्वाचे असून प्रज्वला अभियान हे त्यादिशेने टाकलेले महत्वाचे पाऊल आहे. या अभियानाद्वारे महिलांना एकत्रित आणणे, त्यांचे संघटन, स्वावलंबन, आर्थिक नियोजन आणि विकास अशी प्रणाली तयार होते. या प्रणालीच्या माध्यमातून बचत गटांची महिलांना विकासाची संधी देणारी सक्षम व्यवस्था तयार होणार आहे.

प्रज्वला योजनेच्या माध्यमातून उत्पादनांचे विपणन चांगल्यारितीने होणे महत्वाचे आहे. त्याचबरोबर महिलांच्या पारंपरिक कौशल्याला वाव देणे आवश्यक असून त्यासाठी पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षण उपयुक्त ठरेल, असे त्यांनी सांगितले. अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या माध्यमातून दारिद्र्य रेषेखालील कुटुंबासोबत विधवा, परित्यक्त्या आणि गरजू महिलांना धान्य उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे ना.रावल यांनी सांगितले.

खा.डॉ.गावीत म्हणाल्या, महिलांना कौशल्य विकास योजनेच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्रज्वला योजनेच्या माध्यमातून वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षणानंतर क्लस्टर तयार करून त्याद्वारे वस्तू उत्पादनाला सुरूवात करण्यात येणार आहे. राज्य महिला आयोगामार्फत या वस्तूंच्या विक्रीची व्यवस्था करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. हस्तकलेच्या वस्तूंना चांगली मागणी असून धडगाव येथे महूपासून जॅम आणि सरबत तयार करण्याचा व्यवसाय सुरू करण्यासाठी केंद्र सरकारचे अर्थसहाय्य मिळणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

आ.डॉ.गावीत यांनी महिला एकत्र आल्यास त्याचा अधिक लाभ होऊ शकेल असे सांगितले. शासनाच्या चांगल्या योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रशिक्षण आवश्यक आहे. महिलांनी एकत्र येऊन एकत्र उत्पादन केल्यास त्याला चांगली बाजारपेठ मिळू शकेल. मात्र त्यासाठी गुणवत्तेवरही भर द्यावा, असे ते म्हणाले.

श्रीमती मोकाशी यांनी प्रज्वला योजनेची माहिती दिली. राज्य आयोगाच्या माजी सदस्या देवयानी ठाकरे यांनी महिलांसाठी शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची तर ॲड. उमा चौधरी यांनी कायदेविषयक माहिती दिली. तत्पूर्वी श्रीमती रहाटकर यांनी बचत गटाच्या महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांच्या स्टॉल्सला भेट दिली.

### 'प्रज्वला'चा दुसरा टप्पादेखील नंदुरबारपासून सुरू करणार-विजया रहाटकर

प्रज्वला अभियानाच्या पहिल्या टप्प्यात बचत गटाच्या महिलांना प्रशिक्षीत करण्यात येणार असून दुसऱ्या टप्प्यात क्लस्टरद्वारे उत्पादन करण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहेत. दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ नंदुरबार जिल्ह्यातूनच करण्यात येईल, अशी ग्वाही राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी दिली.

त्या म्हणाल्या, प्रज्वला योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात प्रशिक्षण, दुसऱ्या टप्प्यात क्लस्टरनिर्मिती व बाजारपेठ उभारणे व तिसऱ्या टप्प्यात स्थानिक स्वराज्य संस्थेने जागा उपलब्ध करून दिल्यास प्रज्वला बचत गट बाजाराची उभारणी करण्यात येणार आहे. राज्यातील ६० लाख महिलांनी ३ लाख बचत गट उभे केले असून या सर्व महिलांना या अभियानाच्या माध्यमातून स्वावलंबी करावयाचे आहे. प्रशिक्षणाच्या माध्यमातून त्यांना मार्केटींगचे तंत्र देण्यात येणार आहे. महिलांनी आत्मविश्वासाने या अभियानात सहभागी व्हावे. महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांची माहिती प्रशिक्षणाच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. कुटुंब सक्षम होण्यासाठी महिलांचे सक्षमीकरण महत्वाचे आहे. महिला छोटी बचत करून कुटुंब सक्षम करू शकतात. महिलांनी पैसा टिकवून मुलांचे शिक्षण करावे, असे आवाहन त्यांनी केले. राज्यातील २८८ विधानसभा क्षेत्रात हे अभियान पोहोचविण्यात येणार असून सर्वांनी मिळून बचत गटाची चळवळ पुढे न्यावी. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य महिला आयोगाचे सर्व सहकार्य राहील, अशी ग्वाही श्रीमती रहाटकर यांनी दिली.

पुढारी

# ६० हजार महिलांना ‘प्रज्वला’चा लाभ

## विजया रहाटकर : नंदुरबार येथे उपक्रमाचा प्रारंभ

**नंदुरबार : प्रतिनिधी**

प्रज्वला अभियानांतर्गत महिलांना वस्तू निर्मिती करणे आणि बाजारपेठ उभारणे याचे प्रशिक्षण दिले जात असल्यामुळे राज्यातील तीन लाख बचत गटांतील ६० लाख महिलांना लाभ होणार आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने महिलांच्या हाती बाजारपेठ देण्याचे काम महाराष्ट्र शासन करीत असल्याचे प्रतिपादन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.

छत्रपती शिवाजी नाट्यमंदिर येथे राज्य महिला आयोगातर्फे राबविण्यात येणाऱ्या प्रज्वला उपक्रमाच्या पहिल्या टप्प्याच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, खासदार डॉ. हीना गावित, आमदार डॉ. विजयकुमार गावित, जयकुमार रावल, जिल्हाधिकारी



**नंदुरबार : प्रज्वला उपक्रमाच्या प्रारंभाप्रसंगी महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, खा. हीना गावित, आ. डॉ. विजयकुमार गावित, पालकमंत्री जयकुमार रावल, जिल्हाधिकारी बालाजी मंजुळे, मुख्य कार्यकारी अधिकारी विनय गौडा आदी.**

(छाया : योगेंद्र जोशी)

बालाजी मंजुळे, मुख्य कार्यकारी अधिकारी विनय गौडा, अतिरिक्त पोलीस अधीक्षक चंद्रकांत गवळी, प्रज्वला योजनेच्या अध्यक्षा दीपाली मोकाशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बापूराव भवाने, गटविकास अधिकारी अशोक पटाईत आदी उपस्थित होते.

प्रज्वला अभियानाच्या पहिल्या टप्प्यात बचत गटाच्या महिलांना प्रशिक्षित करण्यात येणार असून, दुसऱ्या टप्प्यात क्लस्टरद्वारे उत्पादन करण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहेत. दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ नंदुरबार जिल्ह्यातूनच करण्यात येईल, अशी ग्वाही राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी दिली. या सर्व महिलांना या अभियानाच्या माध्यमातून स्वावलंबी करावयाचे आहे. प्रशिक्षणाच्या माध्यमातून त्यांना मार्केटिंगचे तंत्र देण्यात येणार आहे. महिलांनी आत्मविश्वासाने या अभियानात सहभागी व्हावे. यावेळी मोकाशी यांनी प्रज्वला योजनेची माहिती दिली. तर राज्य आयोगाच्या माजी सदस्या देवयानी ठाकरे यांनी महिलांसाठी शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची, तर ॲड. उमा चौधरी यांनी कायदेविषयक माहिती दिली. तत्पूर्वी रहाटकर यांनी बचत गटाच्या महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांच्या स्टॉल्सला भेट दिली.

लोकसत्ता

# महिला सक्षमीकरणासाठी प्रज्वला योजना प्रभावी ठरणार - विजया रहाटकर

**वार्ताहर, नंदुरबार**

**राज्यातील तीन** लाख बचत गटांच्या माध्यमातून ६० लाख महिलांच्या सक्षमीकरण आणि स्वयंपुर्णतेसाठी राज्य महिला आयोगाची प्रज्वला योजना प्रभावी ठरणार असल्याचे मत या आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी व्यक्त केले. शनिवारी या योजनेच्या पहिल्या प्रशिक्षण टप्प्याचा शुभारंभ नंदुरबारमधून करण्यात आला. आगामी सहा महिन्यात महिला आयोगामार्फत राज्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात बचत गटांचे मेळावे घेऊन प्रशिक्षणाचा पहिला टप्पा पुर्ण केला जाणार आहे.

यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमास पालकमंत्री जयकुमार रावल उपस्थित होते. प्रज्वला योजनेंतर्गत तीन टप्प्यात राज्यातील महिला बचत गटांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचे प्रयत्न होतील. पहिल्या टप्प्यात प्रशिक्षण, दुसऱ्या टप्प्यात एक जिल्हा एक क्लस्टर आणि तिसऱ्या टप्प्यात प्रत्येक नगरपालिका, महापालिका क्षेत्रात प्रज्वला बचत गटांचे मॉल उभे केले जाणार आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक जिल्ह्यातील काही बचत गटांची निवड करुन त्यांना प्रशिक्षण देऊन त्यांच्या मालाची शासनामार्फत खरेदी केली जाईल. त्याचे ब्रँडिंग आणि विपणनाचे काम देखील महिला आयोग करणार आहे. आकांक्षीत जिल्ह्यात समाविष्ट असलेल्या नंदुरबार जिल्ह्यातील महिला प्रतीभा संपन्न असुन त्यांना बचत गटाच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठीच प्रज्वला योजनेचा शुभारंभ नंदुरबारमधून झाल्याचे रहाटकर यांनी सांगितले. योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभही येथूनच करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

पर्यटनमंत्री जयकुमार रावल यांनी महिला बचत गटांच्या चळवळीला अधिक बळकटी देण्यासाठी शासन तत्पर असल्याचे नमूद केले. पर्यटन विभागाने दिल्लीच्या हाट बाजार धर्तीवर तयार केलेल्या संकुलात महिला बचत गटांना दुकाने उपलब्ध करुन देण्याची घोषणा त्यांनी केली. पर्यटन विभागाच्या पोर्टलवर ऑनलाईन माल विक्री करणाऱ्या कंपन्या प्रमाणेच बचत गटांना देखील संधी उपलब्ध करुन देण्याची ग्वाही त्यांनी दिली. नंदुरबार येथे नाविण्यपूर्ण योजनेतुन छोटेखानी महिला मॉल बांधुन तिथे बचत गटांना स्थायी बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले. कार्यक्रमास खा. डॉ हिना गावित, आमदार विजयकुमार गावित, जिल्हाधिकारी बालाजी मंजुळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विनय गौडा, अप्पर पोलीस अधिक्षक चंद्रकांत गवळी यांच्यासह बचत गटातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### गरजु कुटुंबांना रेशनचे धान्य

राज्यात एपीएल आणि बीपीएल कुटुंबासोबत विधवा, परित्यक्ता, निराधार आणि गरजु कुटुंबांनाही शासकीय स्वस्तधान्य दुकानांतून धान्य पुरविले जाणार असल्याची माहिती जयकुमार रावल यांनी दिली. आगामी दिड ते दोन महिन्यांत जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून या घटकांची यादी तयार करुन त्यांना देखील लवकरात लवकर रेशनचे धान्य दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**आश्वासन** • राज्य महिला आयोगाच्या प्रज्वला अभियानाला झाला प्रारंभ

# बचत गटांच्या वस्तू विक्रीसाठी मॉल

## पर्यटन मंत्री जयकुमार रावल यांची माहिती

प्रतिनिधी | नंदुरबार

## प्रशासनाने जागा उपलब्ध करून द्यावी, बचतगटाच्या महिलांना सक्षम करणार

महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत नावीन्यपूर्ण योजनेतून बचत गटांसाठी नंदुरबार येथे स्वतंत्र मॉल उभारण्यात येईल. त्यासाठी प्रशासनाने तत्काळ सरकारी जागा उपलब्ध करून द्यावी, असे प्रतिपादन राज्याचे पर्यटन, रोहयो, अन्न व नागरी पुरवठामंत्री जयकुमार रावल यांनी केले.

येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिरात राज्य महिला आयोगातर्फे राबविण्यात येणाऱ्या प्रज्वला अभियानाच्या पहिल्या टप्प्याच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते. या वेळी महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, खासदार डॉ. हीना गावित, आमदार डॉ. विजयकुमार गावित, जिल्हाधिकारी बालाजी मंजुळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय गौडा, अतिरिक्त पोलिस अधीक्षक चंद्रकांत गवळी, प्रज्वला योजनेच्या अध्यक्षा दीपाली मोकाशी आदी उपस्थित होते.

मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, बचतगटांनी तयार केलेल्या वस्तूंचे चांगले ब्रँडिंग आणि पॅकेजिंग करून या वस्तूंना बाजारपेठ मिळवून देणे महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने प्रज्ज्वला अभियानांतर्गत देण्यात येणारे प्रशिक्षण उपयुक्त ठरेल. आदिवासी भागातील पारंपरिक दागिने, आमचुर, हस्तकलेच्या वस्तू आदी उत्पादनांना चांगली बाजारपेठ मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या अॅपच्या माध्यमातून बचत गटाच्या उत्पादनांची माहिती देण्यात येईल. पर्यटन विभागाच्या माध्यमातून बचतगटांना गाळे उपलब्ध करून देण्यात येतील.महिलांचा विविध क्षेत्रातील सहभाग वाढावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे. त्यासाठी महिलांचे सबलीकरण होणे महत्त्वाचे आहे. प्रज्ज्वला अभियान हे त्या दिशेने टाकलेले पाऊल आहे. प्रज्ज्वला अभियानाच्या माध्यमातून उत्पादनांचे विपणन चांगल्यारितीने होणे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर महिलांच्या पारंपरिक कौशल्याला वाव देणे आवश्यक असून त्यासाठी पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षण उपयुक्त ठरेल. अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या माध्यमातून दारिद्र्य रेषेखालील कुटुंबासह विधवा, परितक्त्या आणि गरजू महिलांना धान्य उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे मंत्री रावल म्हणाले.

खासदार डॉ. हीना गावित म्हणाल्या, महिलांना कौशल्य विकास योजनेच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्रज्ज्वला अभियानाच्या माध्यमातून वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षणानंतर क्लस्टर तयार करून त्याद्वारे वस्तू उत्पादनाला सुरुवात करण्यात येईल.

राज्य महिला आयोगामार्फत या वस्तूंच्या विक्रीची व्यवस्था करण्यात येणार आहे.

हस्तकलेच्या वस्तूंना चांगली मागणी असून धडगाव येथे महूपासून जॅम आणि सरबत तयार करण्याचा व्यवसाय सुरू करण्यासाठी केंद्र सरकारकडून निधी मिळणार असल्याची माहिती त्यांनी दिली. आमदार डॉ. विजयकुमार गावित यांनी मनोगत व्यक्त केले.

### दुसरा टप्पा नंदुरबारपासून

विजया रहाटकर म्हणाल्या की, 'प्रज्वला'च्या पहिल्या टप्प्यात बचत गटाच्या महिलांना प्रशिक्षित केले जाईल. दुसऱ्या टप्प्यात क्लस्टर निर्मिती व बाजारपेठ उभारणे व तिसऱ्या टप्प्यात स्थानिक स्वराज्य संस्थेने जागा उपलब्ध करून दिल्यास प्रज्वला बचतगट बाजाराची उभारणी होईल. दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ नंदुरबारमध्ये होईल.



नंदुरबारला झालेल्या कार्यक्रमात बोलताना मंत्री जयकुमार रावल.

### आयोगाचे सहकार्य

रहाटकर म्हणाल्या की, महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांची माहिती प्रशिक्षणाच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. कुटुंब सक्षम होण्यासाठी महिलांचे सक्षमीकरण होणे महत्त्वाचे आहे. राज्यातील २८८ विधानसभा क्षेत्रात प्रज्वला अभियान पोहोचविण्यात येणार असून सर्वांनी मिळून बचत गटाची चळवळ पुढे न्यावी.

सकाळ

# बचत गटांचे उत्पादन विक्रीसाठी मॉल उभारू

## मंत्री जयकुमार रावल : नंदुरबारला राज्य महिला आयोगाच्या प्रज्वला योजनेचा प्रारंभ

सकाळ वृत्तसेवा

**नंदुरबार, ता. १५ : जिल्हा वार्षिक योजनेतर्गत नावीन्यपूर्ण योजनेतून महिला बचत गटांच्या उत्पादनांची विक्री करण्यासाठी नंदुरबार येथे मॉल उभारण्यात येईल. त्यासाठी प्रशासनाने तत्काळ सरकारी जागा उपलब्ध करून द्यावी, असे प्रतिपादन राज्याचे पर्यटन, रोहयो, अन्न व नागरी पुरवठामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.**



नंदुरबार : राज्य महिला आयोगातर्फे झालेल्या कार्यशाळेचे उद्‌घाटन करताना पालकमंत्री जयकुमार रावल. शेजारी विजया रहाटकर, खासदार डॉ. हीना गावित, आमदार डॉ. विजयकुमार गावित, जिल्हाधिकारी बालाजी मंजुळे, विनय गौडा, दीपाली मोकाशी, चंद्रकांत गवळी आदी.

येथील छत्रपती शिवाजी नाट्यमंदिरात राज्य महिला आयोगातर्फे राबविण्यात येणाऱ्या प्रज्वला उपक्रमाच्या पहिल्या टप्प्याच्या प्रारंभप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, खासदार डॉ. हीना गावित, आमदार डॉ. विजयकुमार गावित, जिल्हाधिकारी बालाजी मंजुळे, मुख्य कार्यकारी अधिकारी विनय गौडा, अतिरिक्त पोलिस अधीक्षक चंद्रकांत गवळी, प्रज्वला योजनेच्या अध्यक्षा दीपाली मोकाशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बापूराव भवाने, गटविकास अधिकारी अशोक पटाईत आदी उपस्थित होते.

मंत्री रावल म्हणाले, की राज्यातील बचत गटांच्या उत्पादनांचे चांगले ब्रँडिंग आणि पॅकिंग करून त्यांना बाजारपेठ मिळवून देणे महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने प्रज्वला योजनेतर्गत देण्यात येणारे प्रशिक्षण उपयुक्त ठरेल. आदिवासी भागातील पारंपरिक दागिने, आमचूर, पारंपरिक हस्तकला अशा उत्पादनांना चांगली बाजारपेठ मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या वतीने तयार होणाऱ्या ॲपच्या माध्यमातून बचत गटाच्या उत्पादनांची माहिती देण्यात येईल. पर्यटन विभागाच्या हॉटेल्सच्या माध्यमातूनदेखील बचत गटांच्या उत्पादनांसाठी गाळे उपलब्ध करून देण्यात येतील. महिलांचा विविध क्षेत्रातील सहभाग वाढावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे. यासाठी महिलांचे सक्षमीकरण महत्त्वाचे असून प्रज्वला अभियान हे त्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. या अभियानाद्वारे महिलांना एकत्रित आणणे, त्यांचे संघटन, स्वावलंबन, आर्थिक नियोजन आणि विकास अशी प्रणाली तयार होते. या प्रणालीच्या माध्यमातून बचत गटांची महिलांना विकासाची संधी देणारी सक्षम व्यवस्था तयार होणार आहे.

खासदार डॉ. गावित म्हणाल्या, की महिलांना कौशल्य विकास योजनेच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्रज्वला योजनेच्या माध्यमातून वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षणानंतर वस्तू तयार करून त्याद्वारे वस्तू उत्पादनाला सुरवात करण्यात येणार आहे. राज्य महिला आयोगामार्फत या वस्तूंच्या विक्रीची व्यवस्था करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. हस्तकलेच्या वस्तूंना चांगली मागणी असून [illegible] येथे महुपासून जॅम आणि सरबत तयार करण्याचा व्यवसाय सुरू करण्यासाठी केंद्र सरकारचे अर्थसाहाय्य मिळणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

आमदार डॉ. गावित यांनी महिला एकत्र आल्यास त्यांचा अधिक लाभ होऊ शकेल, असे सांगितले. शासनाच्या चांगल्या योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रशिक्षण आवश्यक आहे. मोकाशी यांनी प्रज्वला योजनेची माहिती दिली. 'प्रज्वला' अभियानाच्या पहिल्या टप्प्यात बचत गटाच्या महिलांना प्रशिक्षित करण्यात येणार असून दुसऱ्या टप्प्यात कलाकुसरीद्वारे उत्पादन करण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहेत. दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ नंदुरबार जिल्ह्यातून करण्यात येईल, अशी ग्वाही राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी दिली.

त्या म्हणाल्या, की प्रज्वला योजनेतर्गत पहिल्या टप्प्यात प्रशिक्षण, दुसऱ्या टप्प्यात कलाकृतीनिर्मिती व बाजारपेठ उभारणे व तिसऱ्या टप्प्यात स्थानिक स्वराज्य संस्थेने जागा उपलब्ध करून दिल्यास प्रज्वला बचत गट बाजाराची उभारणी करण्यात येणार आहे. राज्यातील ६० लाख महिलांनी ३ लाख बचत गट उभे केले असून या सर्व महिलांना या अभियानाच्या माध्यमातून स्वावलंबी करायचे आहे. प्रशिक्षणाच्या माध्यमातून त्यांना मार्केटिंगचे तंत्र देण्यात येणार आहे. महिलांनी आत्मविश्वासाने या अभियानात सहभागी व्हावे. महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांची माहिती प्रशिक्षणाच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. कुटुंब सक्षम होण्यासाठी महिलांचे सक्षमीकरण महत्त्वाचे आहे. महिला छोटी बचत करून कुटुंब सक्षम करू शकतात. महिलांनी पैसा टिकवून मुलांचे शिक्षण करावे, असे आवाहन त्यांनी केले. राज्यातील २८८ विधानसभा क्षेत्रात हे अभियान पोहोचविण्यात येणार असून सर्वांनी मिळून बचत गटाची चळवळ पुढे न्यावी. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य महिला आयोगाचे सर्व सहकार्य राहील, अशी ग्वाही श्रीमती रहाटकर यांनी दिली.